संपूर्ण माणदेशात एकाचवेळी प्रसिध्द होणारे एकमेव दैनिक

mandeshexpressatp@gmail.com

दैनिक

माणदेशी बुलंद आवाज..

# माणदेश एक्सप्रेस

संपादक : दिपक गौतम प्रक्षाळे

मोबा. ९५९५०४७६७६/९५०३६३८६८६

www.mandeshexpress.com

एम एन जाधव (सर) हॉस्पिटल यांचे

श्राव्या डायग्नोस्टिक्स

डिजिटल एक्स-रे सोनोग्राफी सेंटर,आटपाडी

डॉ.सौ. चैताली सतेश जाधव (M.B.B.S. D.M.R.E.)

डॉ. सतेश मधुकर जाधव (M.B.B.S.M.S. D.N.B. F.M.S.)

उपलब्ध सुविधा

* सर्व प्रकारचे डिजिटल एक्स-रे * गरोदर मातांची सोनोग्राफी 4 D स्कॅन व गर्भातील बाळांचे व्यंग निदान करणे * पोटाची, छातीची, थायराईड व स्तनाची अत्याधुनिक (हाय रिझोल्यूशन) स्कॅन * वंधत्वसाठीची आणि पाळीच्या समस्या बाबतच्या सोनोग्राफी * इंटरव्हेशनल सोनोग्राफी * सोनोग्राफीद्वारे गाठीचा तुकडा तपासणे, छातीतील किंवा पोटातील पाणी. पु काढणे. तसेच लिव्हर मधील गाठीचा (Abcess) सोनोग्राफीद्वारे उपचार

पत्ता : ग्रामीण रुग्णालयासमोर, आटपाडी



● वर्ष : ७ वे ● ● अंक : १२७ वा ● ● गुरुवार दि. २८ मार्च २०२४ ● ● किंमत २ रु ● पाने : ४ ● RNI : MAHMAR/2017/77021 Postl Reg : SGL/143/2023-2025

## लोकसभेसाठी शिवसेना ठाकरे गटाची पहिली यादी जाहीर

# सांगलीतून पै.चंद्रहार पाटील यांना संधी

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**मुंबई :** लोकसभा निवडणुकीची पहिली यादी शिवसेना ठाकरे गटाने जाहीर केली आहे. सांगलीतून डबल महाराष्ट्र केसरी पै. चंद्रहार पाटील यांना संधी देण्यात आली आहे. तर ठाण्यातून राजन विचारेंना संधी देण्यात आली आहे. काल यादी जाहीर होईल असं सांगण्यात आलं होते. त्यानुसार ही यादी जाहीर करण्यात आली आहे. खासदार संजय राऊत यांनी सोशल मिडियावर यादी पोस्ट करत लोकसभेचे शिवसेना ठाकरे गटाचे १७ उमेदवार जाहीर केले आहेत.



नरेंद्र खेडकर



संजय देशमुख


संजोग वाघेरे पाटील


चंद्रहार पाटील


नागेश आष्टिकर


चंद्रकांत खैरे


ओमराजे निंबाळकर


भाऊसाहेब वाघचौरे


राजाभाऊ वाजे


अनंत गीते


विनायक राऊत


राजन विचारे


अनिल देसाई


संजय दिना पाटील


अरविंद सावंत


अमोल किर्तीकर


संजय जाधव

यामध्ये नरेंद्र खेडकर-बुलढाणा, संजय देशमुख-यवतमाळ-वाशिम, संजोग वाघेरे पाटील-मावळ, चंद्रहार पाटील-सांगली, नागेश आष्टिकर-हिंगोली, चंद्रकांत खैरे-छत्रपती संभाजी नगर, ओमराजे निंबाळकर-धाराशिव, भाऊसाहेब वाघचौरे-शिर्डी, राजाभाऊ वाजे-नाशिक, अनंत गीते-रायगड, विनायक राऊत-सिंधुदुर्ग, रत्नागिरी, राजन विचारे-ठाणे, अनिल देसाई- मुंबई दक्षिण मध्य, संजय दिना पाटील-मुंबई ईशान्य, अरविंद सावंत-मुंबई दक्षिण, अमोल किर्तीकर-मुंबई वायव्य, संजय जाधव-परभणी यांना उमेदवारी मिळाली आहे.

शिवसेनेकडून अजूनही अद्याप चार ते पाच जागांवरील उमेदवारांची घोषणा होणं बाकी आहे. वंचितच्या भूमिकेनंतर या चार ते पाच जागांवरील निर्णय घेण्यात येणार असल्याचे समजते. ठाकरेंकडून कल्याणच्या जागेसाठीही अद्याप उमेदवारी जाहीर केलेली नाही.

कल्याणमध्ये महायुतीकडून श्रीकांत शिंदेंना उमेदवारी जवळपास निश्चित आहे. श्रीकांत शिंदेंविरोधात ठाकरे गटाकडून केदार दिघेंना उमेदवारी देण्यात येणार असल्याचं बोललं जात आहे.

## तर सांगलीत मैत्रीपूर्ण लढतीची तयारी : विश्वजीत कदम

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**सांगली :** सांगलीची जागा काँग्रेसलाच मिळावी, यासाठी माजी मंत्री, आमदार विश्वजित कदम यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे, संघटना सरचिटणीस के. सी. वेणूगोपाल, राष्ट्रीय आघाडी समितीचे अध्यक्ष मुकुल वासनिक यांची दिल्लीत भेट घेतली. शिवसेना ठाकरे गटाने सांगलीच्या जागेवर उमेदवार जाहीर केला असला तरी या जागेवरील तिढा अजूनही सुटला नाही. कुठल्याही परिस्थितीत सांगली लोकसभा लढवायचीच, अशा भूमिकेत काँग्रेस पक्ष आहे. वेळ पडल्यास मैत्रीपूर्ण लढतीचीही तयारी काँग्रेस पक्षाची असल्याचे प्रतिपादन माजी मंत्री डॉ. विश्वजीत कदम यांनी केले.


विश्वजीत कदम

यावेळी बोलताना विश्वजीत कदम म्हणाले, काँग्रेस पक्षाला, काँग्रेस पक्ष नेतृत्वाला आम्ही आमची भूमिका कळवली आहे. पक्ष नेतृत्व आमच्या भूमिकेचा आणि भावनेचा विचार करेल, अशी अपेक्षा आहे. अखेरच्या क्षणी मैत्रीपूर्ण लढत करायची झाली तरी त्यासाठी आमची तयारी आहे. पक्ष ज्या पद्धतीने आदेश देईल, त्या पद्धतीने पुढे जाऊ असे विश्वजीत कदम म्हणाले. हे सांगताना सांगलीच्या जागेवरील दावा कुठल्याही परिस्थितीत सोडणार नाही, वेळ आली तर शिवसेना ठाकरे गटाला आव्हान देण्याची तयारी आहे, असे सुतोवाच विश्वजीत कदम यांनी केले.

सांगलीतुन चंद्रहार पाटलांची उमेदवारी जाहीर होताच विश्वजित कदमांनी दिल्ली गाठली. आणि काँग्रेस नेत्यांकडे आपले गाऱ्हाणे मांडले. विश्वजित कदम यांनी सांगलीच्या जागेवरील विषय सोनिया गांधी, राहुल गांधी यांच्यापर्यंतही पोहोचवला असल्याचे सांगितले. विश्वजित कदम यांच्यासह विशाल पाटील, आमदार विक्रमसिंह सावंत, सांगली शहराध्यक्ष पृथ्वीराज पाटील उपस्थित होते.

काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांच्याशी भेट झाल्यानंतर विश्वजीत कदम यांनी माध्यमांशी संवाद साधला. यावेळी बोलताना विश्वजीत कदम म्हणाले की, सांगलीच्या जागेसंदर्भात आम्ही काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे, काँग्रेसचे संघटना सरचिटणीस के. सी. वेणुगोपाल, काँग्रेसच्या राष्ट्रीय आघाडी समितीचे अध्यक्ष मुकुल वासनिक यांची भेट घेतली आहे. सांगली जिल्ह्यातील काँग्रेस कार्यकर्त्यांच्या नेत्यांच्या मनातील भावना त्यांच्यापर्यंत पोहोचवल्या आहेत.

आज परिस्थितीत सांगली लोकसभेत काँग्रेसचे दोन आणि राष्ट्रवादी शरद पवार गटाचे एक असे तीन आमदार आहेत. गावागावांमध्ये विविध स्तरावर काँग्रेस पक्षाचे कार्यकर्ते प्रतिनिधित्व करत आहेत. सांगली लोकसभेचे वातावरण काँग्रेसमय आहे. त्यामुळे सांगली लोकसभेतून विशाल पाटलांना उमेदवारी देण्याबाबत आम्ही आग्रही आहोत, हीच भूमिका आम्ही पक्षश्रेष्ठींना कळवली आहे. यापूर्वीही ही भूमिका कळवली असल्याचे विश्वजीत कदम म्हणाले.

## जिल्हा काँग्रेस कमिटीची दिल्लीवारी

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**सांगली :** सांगली लोकसभा जिंकण्याची क्षमता काँग्रेसमध्येच असून ही जागा काँग्रेस पक्षाला मिळावी यासाठी जिल्ह्यातील नेतेमंडळींनी काँग्रेसचे जेष्ठ नेते मुकुल वासनिक, अखिल भारतीय काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे, यांची दिल्लीत भेट घेतली.


**नवी दिल्ली : येथे काँग्रेसचे जेष्ठ नेते मुकुल वासनिक व मल्लिकार्जुन खर्गे यांना निवेदन देताना विश्वजीत कदम, विशाल पाटील, विक्रम सावंत, पृथ्वीराज पाटील**

सांगली लोकसभा मतदारसंघ काँग्रेसलाच मिळावा, अशी भावना जिल्ह्यातील काँग्रेस कार्यकर्त्यांची आणि जनतेची असल्याचे मुकुल वासनिक व मल्लिकार्जुन खर्गे यांच्या निदर्शनास आणून दिले. त्यामुळे या जागेबाबत शिवसेना प्रमुख आणि महाविकास आघाडीतील प्रमुख नेते उद्धव ठाकरे यांना विनंती करून ही जागा काँग्रेसकडे घ्यावी, अशी आग्रही मागणी करण्यात आली. यावेळी सांगली जिल्हा काँग्रेसचं नेतृत्व माजी मंत्रीविश्वजीत कदम, आमदारविक्रम सावंत, शहराध्यक्ष पृथ्वीराज पाटील, विशाल पाटील आदी मान्यवर उपस्थित होते.

## अल्पवयीन दुचाकी चोरट्यास अटक

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**सांगली :** जिल्ह्यातील सांगली, मिरज, आष्टा आदी परिसरातून दुचाकी चोरणाऱ्या अल्पवयीन मुलास इस्लामपूरजवळ ताब्यात घेण्यात आले. त्याच्याकडून चार गुन्हे उघडकोस आणण्यात यश आले आहे. त्याच्याकडून एक लाखाच्या चार दुचाकी जप्त करण्यात आल्याची माहिती एलसीबीचे पोलिस निरीक्षक सतीश शिंदे यांनी दिली.


**सांगली : अल्पवयीन दुचाकी चोरट्यास अटक करून त्याच्याकडून जप्त करण्यात आलेल्या दुचाकी व तपास करणारे पोलीस अधिकारी व कर्मचारी**

जिल्ह्यातील दुचाकी चोरीचे गुन्हे उघडकीस आणण्यासाठी निरीक्षक शिंदे यांनी सहायक निरीक्षक पंकज पवार यांचे एक विशेष पथक तयार केले आहे. पथक वाळवा तालुक्यात गस्त घालत असताना बहादूरवाडी कोरेगाव रस्त्यावर एक अल्पवयीन मुलगा दुचाकी घेऊन जात असल्याचे पथकाच्या लक्षात आले. पथकाने त्याला ताब्यात घेऊन कसून चोकशी केल्यानंतर त्याने सांगली, आष्टा, मिरज, चिंचणी वांगी आदी परिसरातून चार दुचाकी चोरल्याची कबुली दिली. त्यानंतर त्याच्याकडील चोरीच्या चार गाड्या जप्त करण्यात आल्या. एलसीबीचे पोलिस निरीक्षक सतीश शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक निरीक्षक, पंकज पवार, उपनिरीक्षक कुमार पाटील, अरूण पाटील, सचिन धोत्रे, अभिजित ठाणेकर, रोहन घत्ते, कॅप्टन गुंडवाडे, स्वप्नीलनायकोडे, अजित पाटील आदींच्या पथकाने ही कारवाई केली.

## सांगलीत हळद दराचा पुन्हा विक्रम

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**सांगली :** मंगळवारी सांगली बाजारात हळद दराने पुन्हा क्विंटलला ७० हजारांचा टप्पा गाठला असून सोन्यापेक्षा अधिक दर हळदीला मिळाला आहे. गेल्या आठवड्यात हळद दराने ६१ हजारांचा विक्रम नोंदवला होता. सांगली बाजार समितीमध्ये मंगळवारी काढण्यात आलेल्या हळद सौद्यामध्ये संगमेश्वर ट्रेडर्स या बाजार समिती संचालक काडाप्पा वारद यांच्या अडत दुकानामध्ये हळदीला प्रति क्विंटल ७० हजारांचा दर मिळाला. मल्लिकार्जुन तेली (रा. हदीगुंद, ता. रायबाग, जि. बेळगाव) या शेतकर्याने विक्रीसाठी आणलेल्या राजापुरी हळदीला हा सर्वोच्च दर मिळाला. शेतकर्याचे ११ पोत्यांचे एक कलम होते. या हळदीची सर्वोच्च बोली खरेदीदार श्रीकृष्ण कार्पोरेशन या पेढीकडून लावण्यात आली.


**सांगली : हळद उत्पादन करणारे शेतकरी व अडत व्यापारी यांचा सत्कार करताना बाजार समितीचे सभापती सुजयनाना शिंदे व उपस्थित मान्यवर**

मंगळवारी झालेल्या सौद्यासाठी १७ हजार ५२५ क्विंटल इतकी आवक असून यापैकी ९३५८ पोती इतकी विक्री झाली आहे. आज हळदीस कमीत कमी दर रुपये १६ हजार ५०० व जास्तीत जास्त ७० हजार इतका झाला, याप्रसंगी मोठ्या प्रमाणात खरेदीदार, व्यापारी, शेतकरी, हमाल आदी उपस्थित होते. बाजार समितीचे सभापती सुजयनाना शिंदे यांनी हळद उत्पादन करणारे शेतकरी व अडत व्यापारी यांचा सत्कार केला तसेच शेतकर्यांनी आपली हळद हा शेतीमाल सांगली बाजारात विक्रीसाठी आणावा असे आवाहन सभापती शिंदे व सचिव महेश चव्हाण यांनी केले आहे.

# २१ लाखांचा गुटखा जप्त

## विटा पोलिसांची कामगिरी : पिकअप जीप सह आरोपी ताब्यात

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**विटा :** गुहागर-विजापूर मार्गावर विट्याजवळ पिकअप जीपमधून अवैधरित्या गुटख्याची वाहतूक करणाऱ्या एकाला अटक करण्यात आली. त्याच्याकडून पिकअप जीप, व प्रतिबंधित गुटखा असा २१ लाखांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. विटा पोलीस पथकाने ही कारवाई केली. ऋषीकेश चंद्रकांत कदम (वय २२ रा दारूज, ता. खटाव, जि. सातारा असे अटक केलेल्या आरोपीचे नाव आहे.

विजापूर रस्त्यावरून एका पिकअपमधून गुटख्याची वाहतूक होणार असल्याची माहिती पोलीस निरीक्षक शरद मेमाणे यांना खबऱ्याद्वारे मिळाली होती. त्यांनी याबाबत पथकाला कारवाईच्या सूचना दिल्या होत्या. विटा पोलिसांचे एक पथक गस्त घालत असताना पिकअप जीप (एमएच ११ डीडी ४३९०) पथकाला दिसली. पथकाने गाडी थांबवून गाडीची तपासणी केली. त्यावेळी पोत्यांमध्ये प्रतिबंधित गुरख्याच्या पुड्या सापडल्या.



**विटा : विटा पोलिसांनी जप्त केलेला गुटखा, पिकअप जीप व तपास करणारे पोलीस अधिकारी व कर्मचारी**

याबाबत कदम याच्याकडे चौकशी केल्यानंतर उडवाउडवीची उत्तरे दिली. त्याला अटक करून गाडीसह त्यातील गुटखा जप्त करण्यात आला. याप्रकरणी विटा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. विट्याचे पोलिस निरीक्षक शरद मेमाणे यांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक सचिन शेंडकर, उत्तम माळी, अमोल कराळे, हेमंत तांबेवाघ, महेश संकपाळ, महेश देशमुख, अक्षय जगदाळे, विशाल पवार, नीरज नार, कॅप्टन गुंडवाडे, श्रीधर बागडी, अजय पाटील, स्वप्नील नायकोडे आदींच्या पथकाने ही कारवाई केली.

# टेंभू योजनेतून यादववस्ती बंधारा भरून द्या

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**दिघंची :** टेंभू योजनेच्या पाण्यातून दिघंची येथील यादव वस्ती बांधारा भरून द्यावा अशी मागणी या परिसरातील शेतकऱ्यांनी टेंभू योजनेच्या अधिकाऱ्यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

दिघंची परीसरामध्ये दुष्काळी परिस्थितीची जाणीव होवू लागली आहे.शेतकऱ्यांच्या शेतातील पिके जळून जाण्याच्या मार्गावर आहेत. तर जनावरांच्या हिरव्या चाऱ्याचा प्रश्न गंभीर बनला आहे. त्यामुळे टेंभू योजनेतून माण नदीवरील दिघंची जवळ असणारा यादववस्ती बंधारा भरून दिल्यास या परिसरातील पिण्याच्या पाण्या बरोबरच जनावरांच्या व शेतीच्या पाण्याचा प्रश्न काही प्रमाणात निकाली निघणार असून याचा फायदा शेतकऱ्यांना होणार आहे.


**आटपाडी : दिघंची येथील यादव वस्ती बंधारा टेंभू योजनेच्या पाण्यातून भरून द्यावा या मागणीचे निवेदन टेंभू योजनेच्या अधिकाऱ्यांना देताना उपस्थित मान्यवर**

यावेळी शहाजी यादव, श्रीरंग शिंदे, अशोक देशमुख, अतुल यादव, विलासराव देशमुख, डॉ.उन्मेश देशमुख, डॉ. दिगंबर मोरे यावेळी उपस्थित होते. टेंभू योजनेचे अभियंता महेश पाटील यांना निवेदन स्वीकारले.

## वंचितचे लोकसभेला आठ उमेदवार जाहीर

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**मुंबई :** लोकसभा निवडणुकीसाठी प्रकाश आंबेडकर यांनी अकोल्यात पत्रकार परिषद घेत आपल्या पक्षाचे ८ उमेदवार जाहीर केले. उमेदवार जाहीर करतांना त्यांनी राजकीयदृष्ट्या उपेक्षित समाजांना यादीत स्थान देत त्यांच्या 'अकोला पॅटर्न'मधील 'सोशल इंजिनिअरींग' साधण्याचा प्रयोग केला आहे.

आंबेडकरांनी अकोल्यात राजकीय भूमिका मांडतांना प्रस्थापित राजकारणावर कठोर प्रहार केला. भटके-विमुक्त, दलित आदिवासी, मुस्लिम, जैन या राजकीय दुर्लक्षित घटकांना आपल्या नव्या राजकीय प्रयोगात सामावून घेणार असल्याचे आंबेडकर म्हणाले. त्यातच त्यांनी जाहीर केलेल्या ८ उमेदवारांत आठ जातींना स्थान दिलं आहे. यात मराठा, बौद्ध, तेली, माळी, बंजारा, गोंड, ढिवर, खाटीक अशा समाजघटकांना स्थान देण्यात आले आहे.

भंडारा-गोंदिया- संजय गजानंद केवट, गडचिरोली-चिमूर -हितेश पांडुरंग मडावी, चंद्रपुर-राजेश वारलुजी बेले, बुलढाणा-वसंत राजाराम मगर, अकोला-प्रकाश यशवंत आंबेडकर, अमरावती-प्राजक्ता तारकेश्वर पिल्लेवान, वर्धा- प्रा.राजेंद्र साळुंके, यवतमाळ-वाशीम -सुभाष खेमसिंग पवार यांना उमेदवारी जाहीर केली आहे.

# संपादकीय

## कोण पक्षात, कोण विरोधात...?

‘कशी नशिबानं थट्टा आज मांडली’ हे गाणं राज्यातील सर्व जनतेला माहित आहे. परंतु हेच गाणे सध्या राज्यातील राजकारणाला लागू पडत असून यामुळे कोण कुठल्या पक्षात अन कोण विरोधात हे मात्र मतदारांना समजण्यास अवघड जात आहे. मागील २०१९ च्या विधानसभा निवडणुकीत भाजप शिवसेनेच्या बाजूने जनतेने बहुमताचा कौल दिला होता. तेव्हा महाराष्ट्रातील जनतेच्या मनात हे पाच वर्षे टिकणारे स्थिर सरकार असेल, अशी भावना होती. त्याला महिन्याभरातच तडा गेला. युती तोडून उद्धव ठाकरे यांनी काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेसबरोबर महाविकास आघाडी स्थापन करून मुख्यमंत्रिपद हस्तगत केले. अजित पवारांबरोबर हातमिळवणी करून देवेंद्र फडणवीस यांनी घेतलेला पहाटेचा शपथविधी औटघटकेचा ठरला. उद्धव ठाकरे अडीच वर्षे मुख्यमंत्री राहिले. मागच्या लोकसभा निवडणुकीच्यावेळेस अमित शहा आणि उद्धव यांच्यात झालेल्या बैठकीत विधानसभेनंतर सेना– भाजप यांच्या मुख्यमंत्रिपद विभागून देण्याचे ठरले होते, असा उद्धव यांचा दावा होता. अगदी अलीकडच्या काळापर्यंत उद्धव वारंवार ते सांगत आहेत. अमित शहा यांच्यासह बहुतेक भाजप नेते हे फेटाळून लावत आले आहेत. नेमकं काय झालं होतं, खरं कुणाचं मानायचं, या प्रश्नाचं उत्तर महाराष्ट्रातील मतदारांना अजून मिळालेलं नाही.

उद्धव मुख्यमंत्री झाले आणि जगभरात कोरोनाचे संकट सुरू झाले. त्यांच्या एकूणच कारभारावर मर्यादा आल्या. त्यात ते भाजपच्या केंद्रीय नेतृत्वाबाबत नको तेवढे गाफील राहिले. सत्तेचा हाताशी आलेला घास हिरावून घेतला गेल्याने भाजपचे नेतृत्व सुडबुद्धीने काय करू शकते, हे नंतरच्या अडीच वर्षात महाराष्ट्राने पाहिले आहे. चाळीस आमदारांसह शिवसेना पक्षच सोबत घेऊन एकनाथ शिंदे यांनी भाजपसोबत युती केली आणि महाराष्ट्रात सरकार स्थापन केले. त्यासाठी जोडण्या आणि जुळण्या करताना अहोरात्र परिश्रम करणारे देवेंद्र फडणवीस यांना इच्छा नसताना उपमुख्यमंत्रिपद स्वीकारावे लागले. पुन्हा येण्याचा शब्द सार्थ करण्यासाठी फडणवीस यांना एक पायरी खाली यावे लागले. त्याची सल त्यांच्या मनात कुठेतरी खोलवर असणार आहे. पुन्हा मुख्यमंत्री झाल्यानंतरच ही सल कदाचित कमी होऊ शकेल.

आता पाहूया कोण कुठे अन कोण कुणीकडे, माढा लोकसभा मतदार संघात रणजितसिंह निबाळकर यांना उमेदवारी जाहीर होताच, मोहिते–पाटील आणि रामराजे निंबाळकर यांनी उघडपणे बंडाचा पवित्रा घेतला. तिकडे सातार्यात उदयनराजे भोसले घड्याळ नको कमळ हवे म्हणून दिल्लीत अमित शहा यांच्या दरबारात जाऊन बसले. बारामतीत सुप्रिया सुळे यांच्याविरोधात अजित पवार यांच्या पत्नी सुनेत्रा पवार प्रचारात उतरल्या. तर शिंदेच्या शिवतारेंनी सवता सुभा मांडला. इकडे काँग्रेसला शाहू महाराज यांच्यामुळे कोल्हापूर मिळाले, पण सांगलीत उद्धव यांनी चंद्रहार पाटील यांची उमेदवारी जाहीर करून काँग्रेसला धोडीपछाड दिली. खरे तर सांगली हा काँग्रेसचा पारंपरिक मतदारसंघ. तिथे जिल्हांतर्गत राजकारणातून वसंतदादा घराण्याची कोंडी करण्यासाठी खेळी झाल्याची बोलवा आहे. सांगलीचे विद्यमान खासदार संजयकाका पाटील यांना भाजपमधूनच मोठा अंतर्गत विरोध असल्याची चर्चा आहे. लोकसभा निवडणुकीला अजून एक महिना बाकी आहे. महायुती आणि महाविकास आघाडी असा सामना महाराष्ट्रात होईल, असे चित्र वरवर दिसते. प्रत्यक्षात मविआ आणि महायुतीमधल्या घटकपक्षांच्या नेत्यांची लढाई अनेक पातळ्यांवरची आहे. पक्षांतर्गत आणि पक्षाच्या बाहेरील असंतुष्टांशी त्यांना सामना करावा लागतो आहे. त्याचे महत्त्वाचे कारण म्हणजे अल्पकाळचे लाभ डोळ्यापुढे ठेऊन झालेल्या तत्त्वशून्य राजकीय तडजोडी. शत्रू कोण, मित्र कोण, आपल्या पक्षातले कोण, विरोधातले कोण हेच कळू नये, इतकी राजकारणात संभ्रमाची परिस्थिती निर्माण झाली आहे. मतदारराजा या सर्वाकडे कसा पाहतो आहे, गेल्या पाच वर्षांतील राजकारणाविषयीचे सामूहिक उत्तर तोच कदाचित लोकसभा निवडणुकीच्या निकालातून देऊ शकेल.




# नांदेड जिल्ह्यात नामनिर्देशनपत्र पत्र भरायला सुरूवात

# उमेदवारांना ४ एप्रिलपर्यंत नामनिर्देशनपत्र दाखल करण्याची मुदत

**नांदेड :** नांदेड लोकसभा मतदार संघामध्ये उद्या दिनांक २८ मार्चपासून नाम निर्देशनपत्र दाखल करण्यात येणार आहे. २८ मार्च ते ४ एप्रिलपर्यंत उमेदवारांना अर्ज दाखल करता येणार आहे. छाननी ५ एप्रिलला होईल. अर्ज ८ एप्रिलपर्यंत मागे घेता येईल. तर नांदेड लोकसभा निवडणुकीत नेमके किती उमेदवार हे आठ तारखेच्या रात्री निश्चित होईल.
नांदेड लोकसभा संघाची निवडणूक २६ एप्रिल रोजी घेण्यात येत आहे. त्यामुळे उद्यापासून तर २६ एप्रिलपर्यत निवडणुकीची लगबग सुरू असणार आहे. लोकसभा निवडणुकीसाठी उमेदवाराला किंवा त्यांच्या सूचकाला नामनिर्देशनपत्रे निवडणूक निर्णय अधिकारी तथा जिल्हाधिकारी नांदेड किंवा सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी तथा उप विभागीय अधिकारी नांदेड यांच्याकडे गुरुवार ४ एप्रिलपर्यत (सार्वजनिक सुट्टी व्यक्तीरिक्त) सकाळी ११ ते दुपारी ३ वाजेपर्यत निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या कार्यालयात सादर करता येईल, असे जिल्हाधिकारी तथा निवडणूक निर्णय अधिकारी अभिजीत राऊत यांनी कळविले आहे.
नामनिर्देशनपत्राची छाननी शुक्रवार ५ एप्रिल २०२४ रोजी सकाळी ११ वाजता जिल्हाधिकारी परिसरातील डॉ. शंकरराव चव्हाण नियोजन भवन सभागृह येथे करण्यात येईल. उमेदवारी मागे घेण्याबाबतची सूचना उमेदवारांना सोमवार ८ एप्रिल २०२४ रोजी दुपारी ३ वाजेपर्यत देता येईल.
नांदेड जिल्हयात २६ लक्ष ९७ हजार २८७ मतदार
नांदेड जिल्ह्यामध्ये २२ मार्च पर्यंत नोंदीनुसार एकूण मतदारांची संख्या २६ लाख ९७ हजार २८७ आहे. एकूण ३ हजार ८१ मतदान केंद्र यासाठी सज्ज झाले आहे. त्यापैकी भोकर, नांदेड उत्तर, नांदेड दक्षिण, नायगाव, देगलूर, मुखेड, या सहा विधानसभा क्षेत्रातील १८.४३ लक्ष मतदार नांदेड लोकसभा मतदारसंघात २ हजार ६२ मतदान केंद्रावरून मतदान करणार आहेत. नांदेड लोकसभा मतदारसंघासाठी ९ लक्ष ५० हजार ९७६ पुरुष, तर ८ लक्ष ९२ हजार १२९ महिला व १३९ तृतीय पंथी आपला मताधिकार बजावणार आहेत.
नांदेड लोकसभा मतदारसंघांमध्ये २५ हजार १४ मतदार हे ८५ वर्ष वयापेक्षा अधिक वयाचे असून त्यांच्यापैकी ज्यांची मतदान केंद्रावर यायची क्षमता नसेल त्यांना बॅलेट पेपरने मतदान करता येणार आहे. प्रशासन त्यांच्या घरी जाऊन मतदान प्रक्रिया पूर्ण करणार आहे.
तर जिल्ह्यातील किनवट व हदगाव विधानसभा क्षेत्रातील ०५.५७ लक्ष मतदार ६४९ केंद्रावरून हिंगोली लोकसभा मतदारसंघासाठी मतदान करणार आहेत. याशिवाय लोहा विधानसभा क्षेत्रातील ०२.९२ लक्ष मतदार ३३० मतदार केंद्रावरून लातूर लोकसभा मतदारसंघासाठी मतदान करणार आहेत.

**निवडणुकीचा कार्यक्रम**
निवडणुकीची घोषणा : १६ मार्च २०२४
निवडणुकीची अधिसूचना : २८ मार्च
नामनिर्देशनाची अंतिम तारीख : ४ एप्रिल २०२४
छाननी : ५ एप्रिल २०२४
अर्ज मागे घेण्याची तारीख : ८ एप्रिल २०२४
मतदान :२६ एप्रिल २०२४
मतमोजणी :४ जून २०२४

## दुय्यम निबंधक कार्यालये २९ ते ३१ मार्च रोजी सुरु

**माणदेश एक्सप्रेस न्युज**
**सांगली :** वार्षिक मुल्यदर तक्ते १ एप्रिल रोजी प्रसिध्द होत असल्याने दुय्यम निबंधक कार्यालयात मार्च महिन्यात दस्त नोंदणीसाठी पक्षकारांची गर्दी होत आहे, त्यामुळे दिनांक २९ ते ३१ मार्च या शासकीय सुट्टीच्या कालावधीतही जिल्ह्यातील सर्व दुय्यम निबंधक कार्यालये सुरू राहणार असल्याचे सह जिल्हा निबंधक वर्ग–१ व मुद्रांक जिल्हाधिकारी अश्विनी सोनवणे जिरंगे यांनी प्रसिध्दीपत्रकाव्दारे कळविले आहे.
दरवर्षी मार्च अखेरनंतर एप्रिल महिन्यात जागांच्या रेडिरेकनरचे दर वाढतात, त्यामुळे लोक मार्च महिना संपण्याआधी दस्त नोंदणी करतात. गेल्या काही वर्षापासून मार्च अखेरच्या सुट्टीच्या दिवशीदेखील दुय्यम निबंधक कार्यालये सुरू ठेवली जात आहेत. यावर्षीदेखील शनिवारी व रविवारी कार्यालय सुरू ठेवण्यात आले. सांगली जिल्ह्यातील १३ दुय्यम निबंधक कार्यालयामध्ये सुट्टीचा दिवस असूनही नागरिकांनी उपस्थित राहून दस्तांची नोंदणी केली आहे. दि. २३ व २४ मार्च या शासकीय सुट्टीच्या दिवशी दुय्यम निबंधक कार्यालये सुरू होती. या दोन्ही दिवशी झालेल्या २५८ दस्तांच्या नोंदणीतून एकूण ८५ लाख ७६ हजार ३९० रूपये इतका महसूल शासन जमा झाला असल्याचे प्रसिध्दी पत्रकात म्हटले आहे.




## चिकुर्डेत स्मशानभूमीत करणीचा अघोरी प्रकार

**माणदेश एक्सप्रेस न्युज**
**वाळवा :** चिकुर्डे (ता.वाळवा) येथील स्मशानभूमीत काळ्या कापडात नारळ,लिंबू,काळ्या बाहुल्या त्यावर मुलींचे फोटो व त्यावर धारदार दाभण खुपसून करणीचा अघोरी प्रकार करण्याचा बुधवारी उघडकीस आला. होळी पौर्णिमेपासून रस्त्याच्या लगत असणाऱ्या स्मशानभूमीत हा प्रकार सुरू होता. बुधवारी महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या कार्यकर्त्यांनी स्मशानभूमीत धाव घेत हा प्रकार उघडकीस आणला.महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे प्रधान सचिव संजय बनसोडे, कार्यकर्ते निवृत्त उपप्राचार्य बी. आर. जाधव, निवृत्त प्राचार्य डॉ. सुदाम माने,विनोद मोहिते यांनी हा नेमका काय प्रकार आहे हे उघडकीस आणल्यावर उपस्थित नागरिकांचे प्रबोधन करून स्मशानभूमीची स्वच्छता केली.
अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या कार्यकर्त्यांनी पोलीस पाटलांच्या समक्ष काळ्या कापडातील लटकत्या बाहुल्या व इतर साहित्य काढले.आत पाहिल्यावर धक्कादायक प्रकार उघडकीस आला. कापड सोडल्यावर त्यातून नारळ, त्यावर काळी बाहुली,लिंबु व मुलींचे रंगीत फोटोला टोकदार दाभनातून नारळात खुपसले होते. तर नारळाला लाल रंगाचा दोरा गुंडाळून त्यात कागदी चिठ्या खुपसल्या होत्या. त्या उघडून पाहिल्यावर कागदावर मुलीचे नाव लिहले आहे. अशी पाच गाठोडी आहेत. यात पाच वेगवेगळ्या मुलींचे फोटो व नावे आहेत. एका कागदावर एका मुलाचे नाव आहे. हे सर्व साहित्य पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.या प्रकरणी दोषींचा शोध घेऊन कठोर कारवाई करण्याची मागणी अंनिसचे प्रधान सचिव संजय बनसोडे यांनी केली आहे.







# निवडणूक आदर्श आचारसहिंता २०२४

काय करावे/करु नये मार्गदर्शक तत्वे
भारत निवडणूक आयोगाने लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ घोषणा केली असून याची आचारसहिंता दि. १६ मार्च पासून सुरु झाली आहे. या काळात काय करावे व काय करु नये याची मार्गदर्शक तत्वे समजून घेवू या.....

**काय करावे**
(१) मैदानासारखी सार्वजनिक ठिकाणे निवडणूक सभा घेण्यासाठी सर्व पक्ष/प्रतिस्पर्धी उमेदवारांसाठी निःपक्षपातीपणे उपलब्ध असणे आवश्यक आहे. तसेच सर्व पक्ष/प्रतिस्पर्धी उमेदवारांसाठी निःपक्षपातीपणे उपलब्ध असणे आवश्यक आहे, जेणेकरून एक समान संधी सुनिश्चित होईल. (२) प्रत्येक व्यक्तीचा शांततापूर्ण आणि अविस्कळीत घरगुती जीवनाचा हक्क पूर्णपणे संरक्षित केला गेला पाहिजे.
(३) स्थानिक पोलिस अधिकाऱ्यांना प्रस्तावित सभांचे ठिकाण आणि वेळ यांची पूर्ण माहिती वेळेत देण्यात यावी आणि सर्व आवश्यक परवानग्या घेतल्या पाहिजेत. (४) प्रस्तावित सभेच्या ठिकाणी कोणतेही मर्यादा घालणारे किंवा प्रतिबंधात्मक आदेश लागू असल्यास, त्यांचा पूर्ण आदर केला जाईल. सूट, आवश्यक असल्यास अर्ज करणे आवश्यक आहे आणि वेळेत प्राप्त करणे आवश्यक आहे. (५) प्रस्तावित सभांसाठी लाऊडस्पीकर किंवा इतर कोणत्याही सुविधा वापरण्यासाठी परवानगी घेणे आवश्यक आहे. (६) सभेत अडथळा आणणाऱ्या किंवा अन्य अव्यवस्था निर्माण करणाऱ्या व्यक्तींवर कारवाई करण्यात येईल.
(७) कोणतीही मिरवणूक सुरू होण्याची वेळ आणि ठिकाण, कोणता मार्ग अनुसरला जाईल आणि मिरवणूक कोणत्या वेळी आणि स्थळी संपेल याचा अगोदरच बंदोबस्त करावा. मिरवणूकीमध्ये जास्तीत जास्त १० वाहनांची मर्यादा निश्चित करण्यात आली आहे. याबाबत पोलीस अधिकाऱ्यांकडून आगाऊ परवानगी घ्यावी. (८) ज्या परिसरातून मिरवणूक निघायची आहे तेथे कोणतेही प्रतिबंधात्मक आदेश अस्तित्वात आहेत का याची खात्री करून त्यांचे पूर्ण पालन केले पाहिजे. तसेच, सर्व वाहतूक नियम आणि इतर निर्बंध, यांचेही अनुपालन करण्यात यावे. (९) मिरवणुकीचा मार्ग वाहतुकीस अडथळा निर्माण करीत नसलेला असावा. (१०) मतदान शांततेत आणि सुव्यवस्थित होण्यासाठी सर्व निवडणूक अधिकाऱ्यांना नेहमी सहकार्य केले पाहिजे. (११) सर्व कामगारानी बॅज किंवा ओळखपत्र प्रदर्शित करणे आवश्यक आहे. (१२) मतदारांना जारी केलेती अकार्यालयीन ओळखचिठ्ठी साध्या (पांढऱ्या) कागदावर असावीत आणि त्यात कोणतेही चिन्ह, उमेदवाराचे नाव किंवा पक्षाचे नाव नसावे. (१३) प्रचार कालावधीत आणि मतदानाच्या दिवशी वाहने चालवण्यावरील निर्बंधीचे पूर्णपणे पालन करावे. (१४) (मतार, उमेदवार आणि त्यांचे निवडणूक/ पोलिंग एजेंट वगळता), केवळ निवडणूक आयोगाचे विशिष्ट वैध प्राधिकार पत्र असलेल्या व्यक्तीच कोणत्याही मतदान केंद्रात प्रवेश करू शकतात. उच्च पदावरील कोणतेही अधिकारी या अटीपासून मुक्त नाहीत. (१५) निवडणूक आयोजित करण्याबाबत कोणतीही तक्रार किंवा समस्या आयोग/रिटर्निंग ऑफिसर/झोनल/ सेक्टर यांनी नियुक्त केलेल्या निरीक्षकांच्या निदर्शनास आणून दिली जाईल. (१६) निवडणूक आयोग, निवडणूक अधिकारी आणि जिल्हा निवडणूक अधिकारी यांचे निर्देश/आदेश/सूचना निवडणुकीच्या विविध पैलूंशी संबंधित सर्व बाबींमध्ये पाळल्या जातील.

**काय करु नये**
(१) सत्ताधारी पक्ष / शासन त्यांनी केलेल्या कामगिरी विषयी सरकारी राज्यकोषातील खर्चाने कोणतीही जाहिरात व सर्व जहिराती काढण्यास प्रतिबंध आहे. (२) कोणताही मंत्री तो किंवा ती उमेदवार असल्याशिवाय किंवा फक्त मतदानासाठी मतदार म्हणून आला असेल त्याशिवाय मतदान कक्षात किंवा मतमोजणीच्या जागी प्रवेश करणार नाही. (३) शासकीय कामाची /निवडणूक मोहिम यांची निवडणूक प्रचार कार्यासोबत सरमिसळ करु नये. (४) मतदाराला, पैशाचे, दारू चे अन्य कशाचेही प्रलोभन दाखवू नये. (५) मतदारांच्या जातीय /समूह भावनांना आवाहन करु नये, प्रलोभन दाखवू नये. (६) वेगवेगळ्या जाती, समूह किंवा धार्मिक किंवा भाषिक गट यांच्यामधील विद्यमान मतभेद वाढतील किंवा परस्पर द्वेष किंवा तणाव निर्माण करील असे कोणतेही काम करण्याचा प्रयत्न करु नये. (७) इतर पक्षांचे नेते किंवा कार्यकर्ते यांच्या सार्वजनिक जीवनाशी संबंधित नसलेल्या खाजगी आयुष्याच्या कोणत्याही पैलूवर टीका करू नये. (८) इतर पक्ष किंवा त्यांचे कार्यकर्ते यांच्यावर, सत्यापित न केलेले आरोप आणि विपर्यस्त माहिती यांच्या आधारावर टिकाटिप्पणी करु नये. (९) देवळे, मशिदी, चर्च, गुरुद्वार किंवा इतर कोणतेही प्रार्थनास्थळ / धार्मिकस्थळ यांचा वापर निवडणूक प्रचाराची भाषणं, भित्तीपत्रके, संगीत यांच्यासह निवडणूक प्रचाराची जागा म्हणून केला जाणार नाही. (१०) मतदारांना लाच देणे, मतदारांवर गैरवाजवी दडपण, मतदारांना धाकदपटशा दाखविणे तोतयेगिरी, मतदान समाप्त करण्यासाठी निश्चित केलेल्या वेळेच्या आधीच्या ४८ तासात सार्वजनिक सभा घेणे, आणि सर्व प्रचार बंद कालावधीत मतदारांची मतदान केंद्रावर ने–आण करण्यासाठी वाहनाची व्यवस्था करणे यासारख्या निवडणूक अपराध समजल्या जाणाऱ्या गोष्टीना मनाई आहे. (११) लोकांच्या मतांचा किंवा त्यांच्या कामांचा निषेध करण्यासाठी त्यांच्या घरासमोर निदर्शन करणे किंवा धरणे धरणे यांचा कोणत्याही परिस्थितीत अवलंब केला जाणार नाही. (१२) स्थानिक कायद्यांच्या अधीन राहून, कोणत्याही व्यक्तीची जमीन, इमारत, आवर भिंत, वाहने इत्यादींच्या मालकाच्या विशिष्ट परवानगीशिवाय (जिल्हा निवडणूक अधिकाऱ्याला दाखविण्यासाठी व त्यांच्याकडे जमा करण्याकरीता) ध्वजदंड उभारण्यासाठी, निशाण्या लावण्यासाठी, सूचना चिकटविण्यासाठी, घोषणा लिहिण्यासाठी कोणीही वापर करणार नाही. (१३) इतर राजकीय पक्ष आणि उमेदवार यांनी आयोजित केलेल्या सार्वजनिक सभा किंवा मिरवणुका यांच्यामध्ये कोणताही गोंधळ निर्माण करु नये. (१४) मिरवणुकीतील लोकांनी, क्षेपणास्त्र किंवा शस्त्र म्हणून कोणतेही शस्त्र / इतर बाळगता येणार नाही. (१५) मतदानाच्या दिवशी ओळखचिठ्ठया वाटपाच्या ठिकाणी किंवा मतदान कक्षाच्या जवळ भित्तीपत्रके, ध्वज, चिन्हे आणि इतर प्रचार साहित्य यांचे प्रदर्शन करु नये. (१६) ध्वनिवर्धकांचा मग ते एका जागी लावलेले असोत किंवा चालत्या वाहनावर बसविलेले असोत, त्यांचा सकाळी ६ पूर्वी किंवा रात्री १० नंतर वापर करण्यास मनाई आहे. (१७) संबंधित प्राधिकाऱ्याच्या लेखी पूर्वपरवानगीशिवाय, सार्वजनिक सभा आणि मिरवणूका यांच्या मध्येही ध्वनिवर्धकाचा वापर करण्यात येऊ नये. (१८) निवडणुकीच्या काळात दारुचे वाटप केले जाणार नाही. (१९) ज्या व्यक्तीच्या सुरक्षिततेला धोका असल्याबाबत खात्री पटली आहे आणि म्हणून तीला सरकारी सुरक्षा पुरविण्यात आली आहे, अशी कोणतीही व्यक्ती, मतदानाच्या दिवशी, त्याच्या सुरक्षा कर्मचारीवर्गासह मतदान केंद्र असलेल्या जागेच्या परिसरात (१०० मीटर्सच्या आत) प्रवेश करणार नाही. तसेच, अशी कोणतीही व्यक्ती, मतदानाच्या दिवशी, त्याच्या सुरक्षा कर्मचारी वर्गासह मतदारसंघामध्ये फिरणार नाही. जर, सरकारी सुरक्षा पुरविलेली व्यक्ती, मतदार असेल तर, केवळ मतदान करण्यासाठी सोबत असलेल्या सुरक्षा कर्मचारी वर्गासह त्याच्या/ तिच्या ये–जा करण्यावर निर्बंध घालील. (२०) ज्या व्यक्तीच्या सुरक्षिततेला धोका असल्याबाबत खात्री पटली आहे आणि म्हणून तिला सरकारी सुरक्षा पुरवली आहे किंवा त्या व्यक्तीकडे खाजगी सुरक्षारक्षक आहेत अशा कोणत्याही व्यक्तीची निवडणूक प्रतिनिधी किंवा मतदान प्रतिनिधी किंवा मतमोजणी प्रतिनिधी म्हणून नियुक्ती करण्यात येवू नये. (२१) प्रचाराचा कालावधी संपल्यानंतर स्टार प्रचारक आणि अन्य यांनी एखाद्या मतदारसंघातील मतदार किंवा उमेदवार किंवा त्या उमेदवाराचा निवडणूक प्रतिनिधी नसल्यास त्या मतदारसंघातून निघून जावे. टिप : वरिल काय करावे आणि काय करु नये याची यादी ही केवळ मार्गदर्शक असून ती संपूर्ण नाही. परिपूर्ण आदेश/निर्देश व सूचना आदर्श आचारसंहिता पुस्तिका (Model Code of Conduct Manual), उमेदवार हँडबुक मध्ये आहे.

**संकलन**
**जिल्हा माहिती कार्यालय,सांगली**

दैनिक माणदेश एक्सप्रेस हे पत्रक श्री. शशिकांत बापूसाहेब कुंभोजकर यांनी प्रकाशक, मालक श्री. दीपक गौतम प्रक्षाळे यांच्यासाठी कुंभोजकर ऑफसेट प्रिंटर्स, २६२, महावीरनगर, सांगली. पीन ४१६४१६ महाराष्ट्र येथे छापून विठ्ठलनगर, आटपाडी, ता. आटपाडी, जि. सांगली पिन– ४१५३०१ महाराष्ट्र येथून प्रसिद्ध केले. या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या, लेख, जाहिराती इ. विषयी संपादक, मुद्रक, प्रकाशक, मालक सहमत असतीलच असे नाही. RNI Reg.No- MAHMAR/2017/77021 (आटपाडी न्यायकक्षेत)

संपूर्ण माणदेशात एकाचवेळी प्रसिध्द होणारे एकमेव दैनिक
mandeshexpressatp@gmail.com
दैनिक माणदेशी बुलंद आवाज...
माणदेश एक्सप्रेस






# नामनिर्देशनपत्र दाखल करताना तीनपेक्षा जास्त वाहने नकोत शिवाय दालनात पाच व्यक्तींपेक्षा जास्त व्यक्तींना प्रवेश नाही

**ठाणे :** भारत निवडणूक आयोगाने लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ साठी १६ मार्च २०२४ रोजी कार्यक्रम घोषित केला असून निवडणूक कार्यक्रम घोषित केल्याच्या दिनांकापासून आदर्श आचार संहिता अंमलात आलेली आहे. या पार्शवभूमीवर जिल्हादंडाधिकारी व जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी श्री. अशोक शिनगारे यांनी फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४ अन्वये १६ मार्च २०२४ ते निवडणूक प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत (दि. ०६ जून २०२४ पर्यंत) प्रतिबंधात्मक आदेश जारी केले असून, त्यानुसार निवडणुकीच्या कालावधीत जिल्ह्यात लोकसभेच्या सार्वत्रिक निवडणुकीची संपूर्ण प्रक्रिया शांततेत, निर्भय व न्याय वातावरणात पार पाडण्याच्या दृष्टीकोनातून निवडणूक कालावधीत निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या कार्यालयात उमेदवारांनी नामनिर्देशनपत्र दाखल करतेवेळेस वाहनांच्या ताफ्यामध्ये तीनपेक्षा जास्त मोटारगाड्या वाहने यांचा ताफ्यात समावेश नसावा. तसेच उमेदवारांनी नामनिर्देशनपत्र दाखल करतेवेळेस निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या दालनात पाच व्यक्तींपेक्षा जास्त व्यक्तींना प्रवेश दिला जाणार नाही. तसेच निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या कार्यालयात नामनिर्देशन पत्र दाखल करतेवेळेस कार्यालयाच्या परिसरात मिरवणूक/सभा घेणे, कोणत्याही प्रकारच्या घोषणा देणे/वाद्य वाजविणे किंवा गाणी म्हणणे आणि कोणत्याही प्रकारचा निवडणूक प्रचार करण्यास प्रतिबंध करण्यात येत असल्याचे आदेश जिल्हादंडाधिकारी व जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी श्री. शिनगारे यांनी लागू केले आहेत.

# महाराष्ट्र शासनाचे १५ वर्षे मुदतीचे २ हजार कोटी रुपयांचे रोखे विक्रीस

**मुंबई :** महाराष्ट्र शासनाच्या १५ वर्षे मुदतीच्या दोन हजार कोटी रुपयांच्या रोख्यांची विक्री १६ मे २०१९ रोजीच्या अटी आणि शर्तींच्या अधीन राहून लिलावाने करण्यात येईल. या कर्जाद्वारे मिळालेल्या रकमेचा विनियोग शासनाच्या विकास कार्यक्रमासाठी केला जाईल, अशी माहिती वित्त विभागाच्या सचिव शैला ए. यांनी पत्रकान्वये दिली आहे.
अस्पर्धात्मक लिलाव पद्धतीनुसार (सुधारित) कर्जरोखे रकमेच्या दहा टक्के रक्कम पात्र वैयक्तिक व संस्थात्मक गुंतवणुकदारांना वाटप करण्यात येईल. मात्र, एका गुंतवणूकदारास एकूण अधिसूचित रकमेच्या जास्तीत जास्त एक टक्का रकमेच्या मर्यादेपर्यंतच वाटप करण्यात येईल. २ एप्रिल २०२४ रोजी भारतीय रिझर्व्ह बँकेतर्फे मुंबई येथील कार्यालयात लिलाव केला जाईल, तर लिलावाचे बीडस् २ एप्रिल २०२४ रोजी संगणकीय प्रणालीनुसार, रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया, कोअर बँकिंग सोल्यूशन, (ई-कुबेर) सिस्टीमनुसार सादर करावयाचे आहेत.
यामध्ये स्पर्धात्मक बिड्स संगणकीय प्रणालीद्वारे ई-कुबेर सिस्टीमनुसार सकाळी १०.३० ते ११.३० वाजेपर्यंत सादर करावेत. तर अस्पर्धात्मक बीडस् ई-कुबेर सिस्टिमनुसार सकाळी १०.३० ते ११.०० पर्यंत सादर करावेत.
लिलावाचा निकाल भारतीय रिझर्व्ह बँकेच्या संकेतस्थळावर त्याच दिवशी प्रसिद्ध करण्यात येईल. यशस्वी झालेल्या बीडर्सकडून रकमेचे प्रदान ३ एप्रिल २०२४ रोजी रोखीने, बँकर्स धनादेश/प्रदान आदेश, डिमांड ड्राफ्ट किंवा त्यांच्या रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया, मुंबई येथील खात्यात देय असलेले धनादेश बँकेची कामकाजाची वेळ संपण्यापूर्वी अधिदानाने प्रदान करण्यात येतील.
कर्जरोख्याचा कालावधी १५ वर्षांचा असून, रोख्यांचा कालावधी ३ एप्रिल २०२४ पासून सुरू होईल, तर कर्जरोख्याची परतफेड दिनांक ३ एप्रिल २०३९ रोजी पूर्ण किमतीने केली जाईल.
व्याजाचा दर लिलावात विक्री केलेल्या रोख्यांवरील दरसाल दर शेकडा कूपन दरा एवढा असेल. व्याजाचे प्रदान प्रतिवर्षी ऑक्टोबर ३ आणि एप्रिल ३ रोजी सहामाही पद्धतीने करण्यात येईल.
शासकीय रोख्यांमधील बँकांची गुंतवणूक ही बँकिंग विनियम अधिनियम १९४९ खालील कलम २४ अंतर्गत सांविधिक रोकड सुलभता गुणोत्तर (SLR) या प्रयोजनार्थ पात्र समजण्यात येईल. हे कर्जरोखे पुन: विक्री-खरेदीसाठी अनुज्ञेय असतील, अशी माहिती वित्त विभागाने दिली आहे.

# बिगबॉस विजेता मुनवर फारुकी पोलिसांच्या ताब्यात!

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**मुंबई :** एल्विश यादव आणि आता मुनावर फारुकी यांच्यावर पोलिसांनी कारवाई केली आहे. हुक्का पार्लर छापा प्रकरणी मुनव्वरला ताब्यात घेण्यात आले होते. मुनव्वरला ताब्यात घेतल्याची बातमी बाहेर आल्यानंतर त्याच्या चाहत्यांना चिंता वाटू लागली. एएनआय या वृत्तसंस्थेनुसार, मुनव्वरला अन्य १३ जणांसह ताब्यात घेण्यात आले. मात्र, चौकशीनंतर त्याला सोडून देण्यात आले.
पोलिसांना मिळालेल्या माहितीनंतर फोर्ट परिसरात छापा टाकण्यात आला. तंबाखूजन्य पदार्थांसोबत निकोटीनचा वापर केला जात असून, त्यावर बंदी असल्याचे त्यांना सांगण्यात आले. एकूण ४,४०० रुपये किमतीचे नऊ हुक्क्याचे भांडे सापडले. तेथे उपस्थित असलेल्या सर्व लोकांची चाचणी घेण्यात आली, ज्यामध्ये मुनव्वरच्या चाचणीचा निकाल पॉझिटिव्ह आला. यानंतर त्यांना तेथून जाण्याची परवानगी देण्यात आली. फारुकी आणि इतरांवर सिगारेट आणि तंबाखू उत्पादने कायद्यासह भारतीय दंड संहितेच्या कलम २८३ (सार्वजनिक मार्गात किंवा मार्गात धोका किंवा अडथळा), कलम ३३६ (जीवन किंवा वैयक्तिक सुरक्षितता धोक्यात आणणारे कृत्य) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला. सुटका झाल्यानंतर मुनवर फारुकीने विमानतळावरील स्वतःचा एक फोटो शेअर केला आहे. त्यांनी लिहिले आहे की मी प्रवास करून थकलो आहे. या फोटोमध्ये मुनव्वरच्या चेहऱ्यावर तणावाचे कोणतेही चिन्ह दिसत नाही.

# कोमल ढोबळे-साळुंखे नाराज

**माणदेश एक्सप्रेस न्युज**


कोमल ढोबळे-साळुंखे

**सोलापूर :** सोलापूर लोकसभेसाठी भाजपकडून राम सातपुते यांना उमेदवारी जाहीर झाल्यावर भाजपचे प्रदेश प्रवक्ते, माजी मंत्री प्रा. लक्ष्मण ढोबळे आणि यांच्या कन्या कोमल ढोबळे-साळुंखे चा हिरमोड झाला आहे. प्रा. ढोबळे यांनी समाजमाध्यमावर आपले मूळ राजकीय गुरू राष्ट्रवादीचे नेते शरद पवार यांच्यासोबतचे स्वतःच्या छायाचित्राचा स्टेटस ठेवला आहे. यातून त्यांची नाराजी प्रकर्षाने प्रकट होत आहे. प्रा. लक्ष्मण ढोबळे यांच्या कन्या कोमल ढोबळे-साळुंखे यांनी तर, मनासारखा उमेदवार नसेल तर नोटासमोरचे बटन दाबा, मतदानाचा हक्क नक्की बजावा, असे ढोबळे समर्थक म्हणून थेट आवाहन करणारी पोस्ट समाजमाध्यमांवर प्रसारित केली आहे. सोबत स्टेटसवर ढोबळे कुटुंबीयांचे शरद पवार यांच्या सोबतचे छायाचित्र प्रसारित केले आहे. या माध्यमातून ढोबळे पिता-कन्येला भाजपचे उमेदवार राम सातपुते यांचा थेट नामोल्लेख टाळून त्यांना मते न देण्याचे आवाहन केले आहे. त्यामुळे हा चर्चेचा विषय ठरला असताना भाजप श्रेष्ठींकडून प्रा. ढोबळे व त्यांच्या कन्या कोमल यांच्यावर कोणती कारवाई करणार की त्यांची समजूत काढणार, याची सर्वांना उत्सुकता आहे.

# आटपाडीत चारा उपलब्ध व नियोजनाबाबत आढावा बैठक संपन्न

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**आटपाडी/प्रतिनिधी :** येथील तहसीलदार कार्यालयात तहसीलदार सागर ढवळे यांच्या उपस्थित आटपाडी तालुक्यातील चारा उपलब्ध व नियोजनाबाबत आढावा बैठक संपन्न झाली. यावेळी बैठकीस गटविकास अधिकारी मुक्तेश्वर माडगुळकर यांच्यासह तालुका कृषी अधिकारी, पशुसंवर्धन अधिकारी आदी प्रमुख अधिकारी बैठकीस उपस्थित होते.
आटपाडी तालुक्यात ५८ हजार पशुधन असून सध्या तालुक्यात ६५ दिवस पुरेल एवढा चार उपलब्ध असल्याची माहिती दिली. यावेळी तहसीलदार सागर ढवळे यांनी सर्व मंडळ कृषी अधिकारी, ग्रामसेवक, ग्रामविस्तार अधिकारी, तलाठी यांनी दिनांक १० एप्रिल पर्यंत तालुक्यात उपलब्ध असणाऱ्या चाऱ्याची माहिती गोळा करण्याचे आदेश दिले. तसेच उपलब्ध असणाऱ्या चाऱ्याबाबत माहिती गोळा करून पुढील आढावा बैठकीत तालुक्यात चारां छावण्या सुरु करायच्या की नाही, याबाबत निर्णय घेण्यात येईल असे बैठकीमध्ये ठरले असल्याची माहिती पुरवठा अधिकारी दादासाहेब पुकळे यांनी दिली.

# मोहिते पाटील हाती घेणार तुतारी

**माणदेश एक्सप्रेस न्युज**


माळशिरस : खास. अमोल कोल्हे यांचे स्वागत करताना मोहिते-पाटील कुटुंबियातील धैर्यशील मोहिते पाटील

**माळशिरस :** अकलूजचे मोहिते पाटील लवकरच शरद पवार यांच्या राष्ट्रावादी काँग्रेस पक्षात प्रवेश करणार आहेत. राज्याचे माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते पाटील यांचे बंधू जयसिंह मोहिते पाटील यांनी याबाबतची माहिती दिली आहे. विजयसिंह मोहिते पाटील, जयसिंह मोहिते पाटील आणि धैर्यशील मोहिते पाटील यांची शरद पवार यांच्यासोबत मुंबईत बैठक होणार आहे. त्यामुळं धैर्यशील मोहिते पाटलांना प्रवेश देवून त्यांची माढा लोकसभेची उमेदवारी जाहीर होण्याची शक्यता आहे.त्यामुळे आता धैर्यशील मोहिते पाटील हे तुतारी चिन्ह घेऊन माढा लोकसभा मतदारसंघाची निवडणूक लढवण्याची शक्यता आहे.
दरम्यान, जयसिंह मोहिते पाटील यांनी दिलेल्या माहितीनुसार, आमदार रणजितसिंह मोहिते पाटील भाजपमध्येच राहणार आहेत. बाकी सर्व मोहिते पाटील परिवार पुन्हा शरद पवार यांच्याकडे परत जाणार असल्याचे जयसिंह मोहिते पाटील म्हणाले. माढा लोकसभा मतदारसंघात भाजपने धैर्यशील मोहिते पाटील यांना उमेदावारी न दिल्यामुळं मोहिते पाटील कुटुंब नाराज आहे. माढा लोकसभा मतदारसंघातून भाजपने पुन्हा रणजितसिंह निंबाळकरांना उमेदवारी दिली आहे. त्यामुळं या मतदारसंघात मोहिते पाटील समर्थक आक्रमक झाले आहेत. कोणत्याही स्थितीत लोकसभेची निवडणूक लढवावी अशी मागणी कार्यकर्ते करत आहेत. तर काही कार्यकर्ते मोहिते पाटलांनी तुतारीच्या चिन्हावर लोकसभेची निवडणूक लढवावी अशी मागणी करत आहेत. त्यामुळे मोहिते पाटील लवकरच शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश करणार आहेत.












# हैदराबादचाचा सुपर विजय ; मुंबईचा सलग दुसरा पराभव

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**हैदराबाद :** हैदराबादविरूद्धच्या सामन्यात मुंबईचा कर्णधार हार्दिकने नाणेफेक जिंकून गोलंदाजीचा घेतलेला निर्णय त्यांना चांगलाच महागात पडला. प्रथम फलंदाजी करताना हैदराबादच्या क्लासेन (८०), अभिषेक शर्मा (६३), हेड (६२), आणि मार्करम (४२) यांच्या तुफानी खेळीच्या जोरावर ऐतिहासिक कामगिरी करत आयपीएलच्या इतिहासातील सर्वाधिक २७७ धावंसख्या उभारली. या आव्हानाचा पाठलाग करताना मुंबईच्या तिलक वर्मानेे दिलेली झुंज अपयशी ठरली. गोलंदाजीमध्ये हैदराबादच्या अचुक गोलंदाजीमुळे मुंबईला निर्धारित २० ओव्हरमध्ये २४६ धावा करता आल्या. यासह हैदराबदने मुंबईला ३१ धावांनी पराभूत करून स्पर्धेतील पहिला विजय मिळवला. सनरायझर्स हैदराबादने दमदार कामगिरी करत मुंबई इंडियन्सचा ३१ धावांनी पराभव केला. हैदराबादचा या स्पर्धेतील हा पहिलाच विजय आहे यात अनेक विक्रम झाले. पॅट कमिन्सच्या नेतृत्वाखाली संघाने आयपीएलच्या इतिहासात सर्वोच्च धावसंख्या उभारली. संघाने २० षटकांत ३ गडी गमावून २७७ धावा केल्या, याला प्रत्युत्तर म्हणून मुंबईला २० षटकांत ५ गडी गमावून २४६ धावा करता आल्या. या विजयासह हैदराबादने गुणतालिकेत तिसरे स्थान गाठले, तर सलग दोन सामने गमावल्यानंतर मुंबईने नवव्या क्रमांकावर घसरण झाली.

हैदराबादने दिलेल्या लक्ष्याचा पाठलाग करताना मुंबईची सुरुवात चांगली झाली. रोहित शर्मा आणि इशान किशन यांच्यात पहिल्या विकेटसाठी ५६ धावांची भागीदारी झाली. ही भागिदारी शाहबाज अहमदने फोडली. त्याने चौथ्या षटकाच्या दुसऱ्या चेंडूवर इशान किशनला बाद केले. त्याने आपल्या खेळीत १३ चेंडूत ३४ धावा केल्या. त्याचवेळी रोहित शर्मांही पाचव्या षटकात २६ धावा काढून माघारी परतला. तिसऱ्या क्रमांकावर फलंदाजीला आलेला नमन धीरने चांगली फलंदाजी करत तिलक वर्मासोबत तिसऱ्या विकेटसाठी ८४ धावांची मोठी भागीदारी केली. जयदेव उंडकटने ही भागीदारी ११व्या षटकात मोडली.

तिलक वर्माने आपल्या खेळीत ६४ धावा केल्या. यामध्ये त्याने दोन चौकार आणि सहा षटकार मारले. पाचव्या क्रमांकावर फलंदाजीला आलेल्या हार्दिक पंड्याला विशेष कामगिरी करता आली नाही. त्याने २० चेंडूत केवळ २४ धावा केल्या. सामन्यात टीम डेव्हिड आणि रोमॅरियो शेफर्ड अनुक्रमे ४२ आणि १५ धावा करून नाबाद राहिले. हैदराबादकडून कर्णधार कमिन्स आणि जयदेव उनाडकट यांनी प्रत्येकी दोन गडी बाद केले. त्याचवेळी शाहबाज अहमदला यश मिळाले. पॅट कमिन्सच्या नेतृत्वाखाली खेळणाऱ्या हैदराबादने आयपीएलच्या इतिहासातील सर्वोच्च धावसंख्या केली. या बाबतीत हैदराबादने आरसीबीचा ११ वर्ष जुना विक्रम मोडला. हैदराबादने मुंबईविरुद्ध २० षटकांत तीन गडी गमावून २७७ धावा केल्या आणि मुंबईसमोर विजयासाठी २७८ धावांचे लक्ष्य ठेवले.

प्रथम फलंदाजी करताना हैदराबादच्या ट्रॅव्हिस हेडने दमदार सुरूवात केली. त्याने मयंक अग्रवालसोबत पहिल्या विकेटसाठी ४५ धावांची भागीदारी केली. अग्रवाल ११ धावा करून पॅव्हेलियनमध्ये परतला. तिसऱ्या क्रमांकावर फलंदाजीला आलेल्या अभिषेक शर्माने दुसऱ्या विकेटसाठी हेडसोबत ६८ धावांची भागीदारी केली. हेडने २४ चेंडूंत नऊ चौकार आणि तीन षटकारांच्या मदतीने ६२ धावा केल्या. त्याने १८ चेंडूत आपले अर्धशतक पूर्ण केले. त्याचवेळी अभिषेक शर्माने आपल्या खेळीत तीन चौकार आणि सात षटकार ठोकत ६३ धावा केल्या.


मुंबई इंडियन्सच्या गोलंदाजांची हैदराबादच्या फलंदाजांनी चांगलीच धुलाई केली. हेनरिक क्लासेन आणि एडन मार्कराम यांच्यात ११६ धावांची नाबाद भागीदारी करून संघाला २७७ धावांपर्यंत नेले. मार्करामने २८ चेंडूंचा सामना करत ४२ धावा केल्या तर हेनरिक क्लासेनने ३४ चेंडूत ८० धावा केल्या. या दमदार खेळीदरम्यान त्याच्या बॅटमधून चार चौकार आणि सात षटकार आले. मुंबईकडून हार्दिक पांड्या, जेराल्ड कोएत्झी आणि पियुष चावला यांनी प्रत्येकी एक विकेट घेतली.











### तिलक वर्माची एकाकी झुंज –

तिलक वर्मा याने मुंबईकडून एकाकी झुंज दिली. तिलक वर्माने हैदराबादच्या गोलंदाजाचा समाचार घेतला. तिलक वर्मा मैदानावर होता, तोपर्यंत मुंबईच्या विजयाच्या आशा जिवंत होत्या. तिलक वर्माने ३४ चेंडूमध्ये ६४ धावांचा पाऊस पाडला. तिलक वर्माने आपल्या खेळीला ६ षटकार आणि दोन चौकारांचा साज होता. तिलक वर्माने नमन धीर याच्यासोबत ३७ चेंडूमध्ये ८४ धावांची भागिदारी केली.

### पॅट कमिन्सने सामना फिरवला...

मुंबई धावांचा पाठलाग करताना योग्य त्या ट्रकवर होती. तिलक वर्मा आणि हार्दिक पांड्या धावांचा पाऊस पाडत होती. टाईम आऊटमध्ये पॅट कमिन्स याने प्लॅन आखला. तो स्वत: गोलंदाजीसाठी आला. पॅट कमिन्स याने तिलक वर्मा याला १५ व्या षटकातील पहिल्याच चेंडूवर बाद केले. या षटकांमध्ये कमिन्सने फक्त तीन धावा दिल्या आणि तिलक वर्माची महत्वाची विकेट घेतली. तिलक वर्मा धोकादायक ठरत होता. त्याने ३४ चेंडूमध्ये ६४ धावा चोपल्या होत्या, यामध्ये सहा षटकारांचा समावेश होता. तिलक वर्माला तर बाद केलेच, पण धावसंख्याही रोखली. १५ व्या षटकानंतरच सामना फिरला.

### टी २० मध्ये सर्वाधिक ५२३ धावा

सनरायजर्स हैदराबाद आणि मुंबई इंडियन्स यांनी धावांचा पाऊस पाडला. या मॅचमध्ये अनेक विक्रमांची नोंद झाली. आतापर्यंतच्या टी-२० क्रिकेटमधील सर्वाधिक धावसंख्या मॅचमध्ये झाली. दोन्ही संघांच्या मिळून ५२३ धावा झाल्या. हैदराबादने पहिल्यांदा बॅटिंग करताना ३ विकेट वर २७७ धावा केल्या. मुंबई या धावांचा पाठलाग करताना ५ विकेटवर २४६ धावा करु शकली.

मुंबईच्या इशान किशननं १३ बॉलमध्ये ३४, नमन धीरनं १४ बॉलमध्ये ३०, रोहित शर्मानं १२ बॉलमध्ये २६ आणि रोमारियओ शेफर्डनं ६ बॉलमध्ये १५ धावा केल्या. या सर्वांचं स्ट्राइक रेट २०० पेक्षा अधिक होतं. मुंबईसाठी तिलक वर्मानं ६४ धावा केल्या. रोहित शर्मानं ३ , इशान किशननं ४, नमन धीरनं २, तिलक वर्मानं ६, हार्दिक पांड्यानं १, टीम डेविडनं ३ आणि शेफर्डनं १ असे एकूण २० सिक्स मुंबईच्या टीमनं मारले. दरम्यान, दोन्ही संघांनी मिळून ३१ चौकार कालच्या मॅचमध्ये मारले.

### हार्दिक पांड्याची संथ खेळी

२७८ धावांच्या आव्हनाचा पाठलाग करताना हार्दिक पांड्याने संथ फलंदाजी केली. हार्दिक पांड्याने मोक्याच्या क्षणी वेगानं फलंदाजी केली नाही. हार्दिक पांड्याने षटकार मारत इरादे स्पष्ट केले, पण त्याला प्रभावी फलंदाजी करता आली नाही. हार्दिक पांड्याने २० चेंडूमध्ये फक्त २४ धावाच करता आल्या. हार्दिक पांड्याने आपल्या खेळीमध्ये एक चौकार आणि एक षटकर ठोकला.

### हैदराबादच्या खेळाडूंची वादळी खेळी

क्लासेननं सलग दुसऱ्या मॅचमध्ये मोठी धावसंख्या केली. क्लासेननं ३४ बॉलमध्ये ७ सिक्ससह ४ चौकारांच्या जोरावर ८० धावा केल्या. तर, ट्रेविस हेडनं ३ सिक्स आणि ९ चौकारांच्या जोरावर ६२ धावा केल्या. अभिषेक शर्मानं २३ बॉलमध्ये ७ सिक्स आणि ३ चौकारांसह ६३ धावा केल्या. हैदराबादनं यासह इतर खेळाडूंच्या धावांसह ३ विकेटवर २७७ धावा केल्या. सनराजयजर्स हैदराबादनं मॅचमध्ये १८ षटकार मारले. यामध्ये अभिषेक शर्मानं ७ षटकार मारले. ट्रेविस हेडनं ३ षटकार मारले. क्लासेननं देखील ७ सिक्स मारले तर मार्क्रम यानं एक सिक्स मारला. हैदराबादच्या तीन फलदांजांनी २०० पेक्षा अधिक स्ट्राइक रेटनं धावा केल्या.

# गुजरातचा लाजिरवाणी पराभव

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**चेन्नई :** घरच्या मैदानावर खेळणार्या चेन्नई सुपरकिंग्जने 'आयपीएल' साखळी सामन्यात गुजरात टायटन्सचा ६३ धावांनी एकतर्फी धुव्वा उडवला. चेन्नईने प्रथम फलंदाजीचे निमंत्रण मिळाल्यानंतर निर्धारित २० षटकांत ६ बाद २०६ धावांचा डोंगर रचला, तर प्रत्युत्तरात गुजरात टायटन्सला २० षटकांत ८ बाद १४३ धावांवर समाधान मानावे लागले. विजयासाठी २०७ धावांचे आव्हान असताना गुजराततर्फे एकाही फलंदाजाला अगदी ४० धावांचा टप्पाही सर करता आला नाही. त्यातच ठरावीक अंतराने गडी बाद होण्याचा सिलसिला कायम राहिल्याने याचा त्यांना मोठा फटका सहन करावा लागला. तिसर्या स्थानावरील साई सुदर्शनने ३७ धावा केल्या आणि हीच गुजराततर्फे सर्वोच्च धावसंख्या ठरली.


चेन्नई : गुजरात विरुद्ध विजय मिळविणारा चेन्नई सुपर किंग्ज चा संघ

याशिवाय, साहा व मिलर यांनी प्रत्येकी २१ धावा केल्या. चेन्नईतर्फे दीपक चहर, मुस्तफिजूर रहमान व तुषार देशपांडे यांनी प्रत्येकी २ बळी घेतले. प्रथम फलंदाजी करताना चेन्नईने निर्धारित २० षटकांत ६ बाद २०६ धावांचा डोंगर रचला, त्यात शिवम दुबेसह ऋतुराज गायकवाड व रचिन रवींद्र यांच्या फटकेबाजीचा मोलाचा वाटा राहिला. ऋतुराज व रचिन यांनी ५.२ षटकांतच ६२ धावांचा फ्लाईंग स्टार्ट दिला, तर ऋतुराजने पुढे अजिंक्य रहाणेसह आणखी ४२ धावा जोडल्या. रहाणे अवघ्या १२ धावांवर बाद




झाल्यानंतर शिवम दुबे मैदानात आला आणि त्याने चौफेर फटकेबाजी करत गुजरातच्या गोलंदाजांची बरीच धुलाई केली. दुबेने २३ चेंडूंत ५१ धावा झोडपल्या. ऋतुराजने ३६ चेंडूंत ४६, तर रचिनने २० चेंडूंत ४६ धावांचे योगदान दिले. याशिवाय, डॅरिल मिशेलने २० चेंडूंत २४ धावा केल्या. गुजराततर्फे राशीद खानने ४ षटकांचा कोटा पूर्ण करताना ४९ धावांत २ बळी घेतले.

# लोकशाही बळकटीकरणासाठी मतदानाचा हक्क बजावावा

### जिल्हाधिकारी डॉ. राजा दयानिधी : मतदार जनजागृतीसाठी सायकल रॅली संपन्न

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**सांगली :** लोकशाही बळकटीकरणामध्ये मतदारांचा सक्रिय सहभाग असणे अत्यंत आवश्यक असून प्रत्येक मतदाराने मतदान करावे, यासाठी स्वीप (डतएएझ) कार्यक्रमांतर्गत विविध उपक्रमांच्या माध्यमातून मतदार जनजागृतीवर भर देण्यात येत आहे. जिल्ह्यात लोकसभा निवडणुकीसाठी येत्या ७ मे रोजी मतदान होत आहे. सर्व मतदारांनी लोकशाही बळकटीकरणासाठी आपला मतदानाचा हक्क बजावावा, असे आवाहन जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. राजा दयानिधी यांनी यावेळी केले.

मतदार जनजागृतीसाठी स्वीप उपक्रमांतर्गत विश्रामबाग सांगली येथे उपस्थित ज्येष्ठ नागरिकांच्या हस्ते हिरवा झेंडा दाखवून सायकल रॅलीस प्रारंभ केला. या सायकल रॅलीमध्ये जिल्हाधिकारी डॉ. राजा दयानिधी, पोलीस अधीक्षक संदीप घुगे, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी तृप्ती धोडमिसे, जिल्हा पुरवठा अधिकारी आशिष बारकुल, महानगरपालिका उपायुक्त वैभव साबळे, आरोग्य अधिकारी रविंद्र ताटे, वैद्यकीय अधिकारी वैभव पाटील, मुख्य अग्नीशमन अधिकारी सुनील माळी, हृदयरोग तज्ज्ञ डॉ. रियाज मुजावर, श्री. बोडस, अरूण लोंढे, यांच्यासह शासकीय अधिकारी, कर्मचारी, सायकल पट्टू, क्रीडा प्रेमी, नागरिक, विविध शाळा, विद्यालयांचे विद्यार्थी, विद्यार्थिनी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. ही रॅली मोठ्या उत्साहात संपन्न झाली.


सांगली : मतदार जनजागृती निमित्त सायकल फेरी काढण्यात आली. यावेळी उपस्थित जिल्हाधिकारी डॉ. राजा दयानिधी व उपस्थित सायकलस्वार

यावेळी जिल्हाधिकारी डॉ. राजा दयानिधी यांनी रॅलीमध्ये सहभाग घेणाऱ्यांचे अभिनंदन करून, ७ मे रोजी मतदान करण्याचे तसेच, इतरांनाही मतदान करण्यासाठी प्रोत्साहित करण्याबाबत आवाहन केले.

विश्रामबाग सांगली येथून काढण्यात आलेली सायकल रॅली पुढे पुष्कराज चौक – राम मंदिर मार्गे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्टेडियम सांगली येथे या रॅलीची सांगता झाली. यावेळी उपस्थित मान्यवरांनी ७ मे रोजी मतदानाचा हक्क बजावण्याचे आवाहन केले. यावेळी उपस्थित सायकल पट्टू, पत्रकार यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. उत्साहपूर्ण वातावरणात या सायकल रॅली कार्यक्रमाची सांगता झाली.

# अधिकारी, कर्मचाऱ्यांच्या डाटाबेसचे फर्स्ट रॅन्डमायझेशन संपन्न

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**सांगली :** लोकसभा सार्वत्रिक निवडणूक-२०२४ करिता सांगली जिल्ह्यातील आठ मतदारसंघातील मतदान केंद्रासाठी नियुक्त मतदान अधिकारी व कर्मचारी यांचे उपलब्ध डाटाबेसची अर्थात पहिले सरमिसळ ( १ीीं ठरपवोळूरींळेप ) अद्ययावत माहिती जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. राजा दयानिधी यांनी जिल्हाधिकारी कार्यालय सभागृहात आज घेतली. प्रारंभी सूचना – विज्ञान अधिकारी (छखउ) यासीन पटेल यांनी छखउ कडे उपलब्ध असलेला पोर्टलमधील माहिती प्रेझेंटेशनद्वारे (सादरीकरण) दिली. केंद्रीय निवडणूक आयोग यांच्याकडील ठज क्रपव इेज्ञ २०२३ प्रकरण ३ मधील सुचनेनुसार तसेच मुख्य निवडणूक अधिकारी महाराष्ट्र राज्य यांच्या १६ मार्चच्या पत्रानुसार सुमारे १५ हजार ४०९ अधिकारी – कर्मचाऱ्यांचे फर्स्ट रॅन्डमायझेशन घेण्यात आले. यावेळी उपजिल्हा निवडणूक अधिकारी निता शिंदे, महसूल उप जिल्हाधिकारी राजीव शिंदे, जिल्हा माहिती अधिकारी फारूक बागवान आदी उपस्थित होते.

